| | |
|---|---|
| MHRT030001092026 | दाखल दिनांक : २०/०१/२०२६<br>नोंदणी दिनांक : २०/०१/२०२६<br>निकाल दिनांक: २८/०४/२०२६<br>कालावधी: ०० व. ०३ म. ०८ दि. |

( भाग – "अ" )

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, न्यायालय क्रमांक –२, रत्नागिरी यांच्या न्यायालयात

( पिठासिन अधिकारी – श्रीमती शबनम युनुस शेख)

**संक्षित फौजदारी खटला क्र.७३/२०२६ नि.क्र. ७ लगत**

**प्रथम खबर अहवाल :– दिनांक १३.११.२०२५**

**गुन्हा रजिस्टर क्रमांक :– २०६/२०२५**

**पोलीस स्टेशन :– रत्नागिरी ग्रामीण पोलिस ठाणे, रत्नागिरी**

महाराष्ट्र शासन तर्फे
रत्नागिरी ग्रामीण पोलिस ठाणे,
ता. जि. रत्नागिरी .. **अभियोग पक्ष**

**अभियोग पक्षातर्फे:– सहा. सरकारी अभियोक्ता श्रीम.आर.एस.दळवी**

**– विरुध्द –**

द्रौपदी गुलाब तिवारी,
वय– ५० वर्षे, एम.आय.डी.सी., मिरजोळे,
ता.जि.रत्नागिरी ... **आरोपी**

**आरोपीतर्फे वकील :– श्री.ए.ए.मुळये**

**( भाग – " ब " )**

| अनु.क्र. | विवरण | दिनांक |
|---|---|---|
| १. | गुन्हा घडल्याचा दिनांक | १३/११/२०२५ |
| २. | प्रथम खबर अहवाल दिनांक | १३/११/२०२५ |
| ३. | दोषारोपपत्र दाखल झाल्याचा दिनांक | २०/०१/२०२६ |
| ४. | गुन्हयाचा तपशिल निश्चीत दिनांक | २७/०३/२०२६ |
| ५. | पुरावा सुरू झाल्याचा दिनांक | ०७/०४/२०२६ |
| ६. | न्यायनिर्णय राखीव केल्याचा दिनांक | २८/०४/२०२६ |
| ७. | न्यायनिर्णय सुनावणीचा दिनांक | २८/०४/२०२६ |

## आरोपीचा तपशिल

| अ.क्र | आरोपीचे नाव | अटक/नोटीस दिनांक | जामीन दिनांक | गुन्ह्याचे कलम | निर्दोष किंवा दोषी | शिक्षा सुनावली | बंदीवान म्हणून असलेला कालावधी भा.ना.सु.सं चे कलम ४६८ करिता |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | द्रौपदी गुलाब तिवारी | भा.ना.सु.सं.कलम ३५(३) प्रमाणे नोटीस दिली. | लागू नाही. | ६५ (इ) मुं.दा.क | निर्दोष | निर्दोष | लागू नाही |

## अभियोगपक्षाचे/ बचाव पक्षाचे/ न्यायालयीन साक्षीदारांची यादी

### अ). अभियोग पक्षाचे साक्षीदार

| अ.क्र. | साक्षीदारांची नावे | निशाणी क्र. | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १. | नईम मोहम्मद पठाण | ०७ लगत | पंच |

### ब). बचावपक्षाचे साक्षीदार जर असतील तर

| अ.क्र. | साक्षीदारांची नावे | निशाणी क्र. | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| -- | -- | – | -- |

### क). न्यायालयीन साक्षीदार असतील तर

| अ.क्र. | साक्षीदारांची नावे | निशाणी क्र. | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| -- | -- | – | -- |

## न्यायालय निशाणी कागदपत्रांची यादी

### ड). अभियोगपक्ष

| अ.क्र. | कागदपत्रांचा तपशील | निशाणी क्र. |
|---|---|---|
| १. | --- | --- |

### इ). भौतिक वस्तु

| अ.क्र. | भौतिक वस्तु क्रमांक | निशाणी क्र. |
|---|---|---|
| १. | -- | -- |

# न्यायनिर्णय

(अधिघोषणा दिनांक :- २८ एप्रिल, २०२६)

दोन्ही पक्षांतर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अभियोग पक्षाचा पुरावा आणि दोन्ही वकिलांचा युक्तीवाद लक्षात घेता माझेसमोर जे मुद्दे उपस्थित झाले ते मुद्दे त्यांच्या उत्तरांसह व त्या उत्तरांच्या कारणांसह खालीप्रमाणे :-

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने हे सिध्द केले आहे काय की, दिनांक १३/११/२०२५ रोजी १८.४५ वाजण्याच्या सुमारास मौजे एम.आय.डी.सी. मिरजोळे रत्नागिरी येथील वाव कंपनीचे शेजारील बंद प्लॉट कंपनीचे भिंतीचे आडोशाला, ता.जि.रत्नागिरी येथे आरोपी बेकायदेशीररित्या सुमारे २० लि. मापाचे पांढ-या रंगाचे प्लॅस्टीकचे कॅन त्यामध्ये ९ लि. गावठी हातभट्टीची दारु त्याच्या ताब्यात बाळगून चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने मिळुन आली व त्याद्वारे महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई) अन्वये गुन्हा केला आहे ? | ... नाही. |
| २. | आदेश काय ? | ... आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## कारणमिमांसा

२) निशाणी क्रं.०१ वरील आदेशान्वये अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. तसेच अभियोगपक्षाच्या पुराव्यामध्ये आरोपीविरुध्द विरोधक असा पुरावा न आल्यामुळे आरोपीचे भा.ना.सु.सं.कलम ३५१ प्रमाणे जवाब रद्द करण्यात आले.

**मुद्दा क्रमांक १ व २ करीता :–**

मुद्दे क्र.१ व २ एकमेकांशी संलग्न असल्याने पुरावा व कथनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी ते एकत्रीत चर्चित आहे.

३) अ.सा.क्र.१/पंच नईम मोहम्मद पठाण यांनी त्यांच्या पुराव्यात, दि.१३/११/२०२५ रोजी त्यांना पोलिसांनी बोलावले नव्हते. त्यांनी कोठेही सही वगैरे केली नाही. पोलिसांनी त्यांची एका कागदावर सही घेतली होती. तसेच त्यांना पंचनाम्यातील मजकूर माहिती नाही असे सांगून अभियोगपक्षास सहकार्य केलेले नाही. त्यामुळे अभियोगपक्षातर्फे सदर साक्षीदारांना उत्तरसुचक प्रश्न विचारण्यात आले. परंतु त्यामध्ये देखील साक्षीदारांनी अभियोगपक्षास उपयुक्त असे कोणतेही कथन मान्य केलेले नाही. त्यामुळे सदर साक्षीदारांच्या पुराव्यातून पंचनामा सिध्द झालेला नाही. तसेच सदर साक्षीदारांनी अभियोगपक्षास सहकार्य केलेले नाही. त्यामुळे सदर साक्षीदारांचा पुरावा आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षास उपयुक्त नाही या मता प्रत मी आले आहे. त्याचप्रमाणे अभियोगपक्षाच्या साक्षीदारांना वारंवार समन्स काढण्यात आले. परंतु साक्षी

समन्स अहवाल संबंधित पोलिस ठाण्यामार्फत अभिलेखावर दाखल करण्यात आला नाही. पुरेशी संधी देवूनही अभियोगपक्ष त्यांच्या साक्षीदारांची उपस्थिती सुरक्षित करु शकलेला नाही त्यामुळे फिर्याद, पंचनामा व इतर कागदपत्रे पुराव्याकामी शाबीत झालेली नाहीत.

४) त्याचप्रमाणे पुरेशी संधी देवूनही अभियोगपक्षातर्फे रासायनिक तपासणी अहवाल अभिलेखावर दाखल करण्यात आलेला नाही. त्यामूळे गुन्हयातील जप्त द्रव्य हे गावठी हातभट्टी दारु होती किंवा कसे याबाबत शंका निर्माण होते. त्याचप्रमाणे अभियोगपक्षाच्या पंच साक्षीदाराने अभियोगपक्षास सहकार्य केलेले नाही. त्यामुळे मुद्देमालाची जप्ती देखील निसंशयपणे सिध्द झालेले नाही. त्यामुळे अभिलेखावरील पुरावा आरोपी विरुध्दचा गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षास उपयुक्त नाही या मताप्रत मी आले आहे. सबब, मी मुद्दा क्र.१ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.२ करीता खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे :-

## आदेश

१. आरोपी नामे **द्रौपदी गुलाब तिवारी** यांना भा.ना.सु.संहितेचे २८७ नुसार महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५ (ई) च्या आरोपातून निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपीचे बंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपीने भा.ना.सु.संहितेचे कलम ४८१(१) नुसार अपील दाखल झाल्यास मा.अपीलीय न्यायालयात हजर राहणेसाठी ६ महिने

मुदतीकरीता रक्कम रु.१५०००/- चे वैयक्तीक बंधपत्र व जामीनपत्र देण्याचे आहे.

४. जप्त मुद्देमालाची नियमाप्रमाणे विल्हेवाट लावण्यात यावी.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर केला)**

SHABNAM YUNUS SHAIKH
Digitally signed by SHABNAM YUNUS SHAIKH
Date: 2026.04.28 15:11:48 +0530

**स्थळ :- रत्नागिरी** **(शबनम युनुस शेख)**

**दिनांक :- २८.०४.२०२६** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,**

**न्यायालय क्र.२, रत्नागिरी.**

**<u>प्रमाणपत्र</u>**

''मी कथन करतो की,पी.डी.एफ. फाईल मधील न्यायनिर्णय हे मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे शब्दशः बरोबर आहे''.

लिपीकाचे नाव :- एस.एन.कुलकर्णी

न्यायालयाचे नाव :- न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, न्यायालय क्र.२, रत्नागिरी.

पी.डी.एफ दिनांक :-दि.२८.०४.२०२६

सांक्षाकित/-

लिपीक